# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय तिसरा

अर्जुन उवाच —

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ।।१।।

ऐका मग पार्थ । केशवातें बोले । देवा, सांगितलें । तुवां जें का ।।१।।
तें तुझें भाषण । ऐकिलें मी चांग । आतां मज सांग । रमा-कांता ।।२।।
पाहतां [१] निष्कर्ष । कर्म आणि कर्ता । नुरे चि [२] तत्त्वतां । आत्मरूपीं ।।३।।
ऐसें तुझें मत । निश्चित अनंता । असे तरी आतां । मजलागीं ।।४।।
म्हणसी कां पार्था । करीं हा [३] संग्राम । कासया हें कर्म । महा-घोर ।।५।।
ऐशा कर्मीं मज । योजितां संकोच । वाटे ना कांहीं च । कैसा तुज ।।६।।
सर्व हि कर्मांचा । करोनि [४] निषेध । तूं चि आत्म-बोध । वाखाणिसी ।।७।।
तरी कां गा ऐसें । कर्म [५] हिंसात्मक । करविसी देख । माझ्या हातें ।।८।।
आतां मनीं तूं चि । विचारोनि पाहें । सुसंगत का हें । हृषीकेशा ।।९।।
जरी मानिसी ना । अल्प हि कर्मासी । कां गा करविसी । ऐसी हिंसा ? ।।१०।।

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ।।२।।

त्वां चि जरी ऐसें । बोलावें श्रीहरी । संपला चि तरी । विवेक तो ।।११।।
आम्ही नेणत्यांनीं । ऐशा स्थितिमाजीं । काय करावें जी, । हृषीकेशा ।।१२।।

---

१ सार; तात्पर्य.   २ वास्तविक पाहतां.   ३ युद्ध.   ४ मनाई; धि:कार.   ५ हिंसेने भरलेले.

जरी हा ऐसा च । तुझा उपदेश । काय [1] मति-भ्रंश । आणिक तो ।।१३।।
व्हावा आत्मबोध । लागली उत्कंठा । भागली ती आतां । भली बापा! ।।१४।।
वैद्य पथ्यपाणी । सांगोनियां जाई । मग विष देई । आपण चि ।।१५।।
तरी सांगें रोगी । वांचेल तो कैसा । वाटे तुझा तैसा । उपदेश ।।१६।।
आंधळ्यासी जैसें । न्यावें आडवाटे । किंवा मर्कटातें । झिंगवावें ।।१७।।
तैसा उपदेश । हा तुझा गोपाळा । भला प्राप्त झाला । आम्हांलागीं ।।१८।।
आम्हीं तों अजाण । वरी मोहग्रस्त । म्हणोनियां हित । विचारिलें ।।१९।।
तंव तुझें देवा । एकैक नवल । [2] आदेशीं केवळ । गुंतागुंत ।।२०।।
तुजलागीं ऐसा । शरण जो आला । घालावें का त्याला । घोंटाळ्यांत ।।२१।।
तुझिया बोलासी । तन-मन-जीवें । आम्हीं [3] वोळंगावें । पद्मनाभा ।।२२।।
आणि तुवां जरी । करावें ऐसेंच । तरी संपलें च । म्हणों आतां ।।२३।।
आतां ह्याच परी । बोधिसी आम्हांसी । तरी तें करिसी । चांगलें च ! ।।२४।।
नको ती ज्ञानाची । धरावया आस । ह्यापुढें आम्हांस । पार्थ म्हणे ।।२५।।
ज्ञान तें राहिलें । राहो देवा, देख । परी झालें एक । आणिक हें ।।२६।।
माझ्या मतें होतें । योजिलें निश्चित । मात्र गुंता त्यांत । झाला आतां ।।२७।।
तेविं कृपासिंधो । प्रभो तुझी लीला । कळे ना आम्हांला । सर्वथैव ।।२८।।
करोनियां काय । बोधाचें निमित्त । पाहतोसी येथ । चित्त माझें ।।२९।।
किंवा प्रभो माझें । करिसी [4] वंचन । सांगसी कीं ज्ञान । [5] गूढार्थानें ।।३०।।
कांहीं च ह्यांतील । नये अनुमाना । म्हणोनि प्रार्थना । तुज आतां ।।३१।।
देवा, नको बोलूं । बोल ऐसे गूढ । तत्त्व तें उघड । सांगें मज ।।३२।।
मी तों असें जरी । मूढाहून मूढ । परी भाव दृढ । तुझ्या ठायीं ।।३३।।
म्हणोनियां तूं हि । ऐसें चि बोलावें । होय जें स्वभावें । एकनिष्ठ ।।३४।।
रोगियासी द्यावें । औषध साचार । रोग-परिहार । करील जें ।।३५।।
परी तें असावें । जैसें सुमधुर । आणि रुचकर । आगळें चि ।।३६।।
सांगावें उचित । तैसें तत्त्वज्ञान । जें का परिपूर्ण । सकळार्थें ।।३७।।

---

१ बुद्धीचा गोंधळ.  २ उपदेशांत.  ३ अवलंबून रहावें.  ४ फसवणूक.  ५ सांकेतिक पद्धतीनें.

तेविं तें असावें । सुबोध अत्यंत । जेणें माझें चित्त । प्रकाशेल ॥३८॥
देवा तुजऐसा । लाभला सद्गुरु । तरी कां न करूं । इच्छा-तृप्ति ॥३९॥
आतां येथें भीड । धरावी कोणाची । देवा तूं आमुची । माउली च ॥४०॥
दैवें *कामधेनु । जाहली स्वाधीन । तरी कां गा [१]वाण । कामनेची ॥४१॥
किंवा जरी भाग्यें । *चिंतामणि जोडे । कासया [२]सांकडें । वासनेचें ॥४२॥
मग जें जें कांहीं । आपुलें वांछित । कां तें मनोगत । इच्छावें ना ॥४३॥
अमृत-सागरा- । सन्निध येवोनि । रहावें होवोनि । [३]तृषाक्रांत ॥४४॥
तरी कां करावे । मागील सायास । तीर गांठायास । जाहले जे ॥४५॥
तैसा जन्मोजन्मीं । उपासितां तुज । सुदैवें तूं आज । लाभलासी ॥४६॥
तरी इच्छी मन । तें तुझ्यापासोन । आतां कां मागोन । घेऊं नये ॥४७॥
जाहला कीं आज । मानसा सुकाळ । पुरले सकळ । मनोरथ ॥४८॥
सर्व हि इच्छांचें । सफल जीवन । यशा आलें पूर्ण । पूर्वपुण्य ॥४९॥
कीं जो सर्वश्रेष्ठ । मांगल्याचें धाम । देव सर्वोत्तम । देवांचा हि ॥५०॥
तो तूं येथें आज । आमुच्या आधीन । झालासी म्हणोन । बोलतों हें ॥५१॥
वेळ ना अवेळ । मातेचिया ठायीं । [४]स्तन्यालागीं पाहीं । बाळकासी ॥५२॥
तैसें माझ्या मना । आलें देवा तें तें । विचारितों तूतें । कृपानिधे ॥५३॥
तरी आचराया । सर्वथा उचित । आणि जेणें हित । पर-लोकीं ॥५४॥
ऐसें मज एक । निश्चयेंकरोन । सांगें विवरोन पार्थ म्हणे ॥५५॥

श्रीभगवानुवाच-
लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥३॥

ऐकोनि हे बोल । मग श्रीअच्युत । होवोनि विस्मित । काय बोले ॥५६॥
म्हणे पार्था तुज । सांगितला येथ । सर्वथा संक्षिप्त । अभिप्राय ॥५७॥
*बुद्धियोगाचें तें । करितां व्याख्यान । *सांख्य-तत्त्वज्ञान । निरोपिलें ॥५८॥
प्रसंगेंकरोन । स्वभावतां येथें । परी त्या हेतूतें । नेणोनियां ॥५९॥

---

*परिशिष्ट पहा. १ तुटवडा. २ संकट. ३ तहानेनें व्याकुळ झालेला. ४ दूध पिण्याकरितां.

धनंजया वायां । क्षोभलासी मनीं । जाण मी चि दोन्ही । सांगितले ।।६०।।
अनादिसिद्ध हे । दोन्ही मार्ग साच । [१]प्रकटिले मीं च । धनुर्धरा ।।६१।।
ज्ञान-योग ऐसें । बोलती एकातें । [२]अनुष्ठिती ज्यातें । *सांख्यमार्गी ।।६२।।
जेथें *साधकासी । होतां *साक्षात्कार । तत्काळ साचार । तद्रूपता ।।६३।।
कर्म-योगीं होतां । साधक प्रवीण । पावती निर्वाण । कालान्तरीं ।।६४।।
जाण अर्जुना हे । मार्ग जरी दोन्ही । परी ते निदानीं । एक होती ।।६५।।
[३]सिद्ध किंवा [४]साध्य । असो स्वयंपाक । परी तृप्ति एक । भोजनान्तीं ।।६६।।
किंवा नदी एक । वाहते पूर्वेस । दुजी पश्चिमेस । भिन्नमार्गें ।।६७।।
एका चि सागरीं । परी दोन्ही अंतीं । जाती जैशा रीती । मिळोनियां ।।६८।।
तैसे हे एका चि । तत्त्वाचे सूचक । दोन्ही मार्ग देख । सव्यसाची ।।६९।।
परी जैसा ज्याचा । असे अधिकार । तैसी च साचार । उपासना ।।७०।।
एक चि भरारी । मारोनियां वृक्षीं । झोंबे जैसा पक्षी । फळालागीं ।।७१।।
सांगें तैशा वेगें । कैसें मनुष्यातें । उडोनियां तेथें । जाववेल ।।७२।।
परी पाहें तो हि । अर्जुना साचार । घेवोनि आधार । मार्गाचा चि ।।७३।।
फांदीफांदीवरी । चढोनियां तेथ। पावतो निश्चित । हळुहळू ।।७४।।
तैसें सांख्यालागीं । ज्ञानाचिया बळें । निर्वाण आकळे । तत्काळ चि ।।७५।।
*विहंगम-मार्गें । तयां मोक्ष-प्राप्ति । कर्मयोग्यांप्रति । दुजा मार्ग ।।७६।।
निष्काम कर्माचा । तयांसी आधार । पाहें पैल पार । पावावया ।।७७।।
विहित *स्व-कर्म । आचरोनि येथें । वेळें पावती ते । पूर्णत्वास ।।७८।।

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ।।४।।

ना तरी अर्जुना । सर्वथा उचित । कर्मारंभ येथ । [५]नाचरोनि ।।७९।।
निश्चयेंकरोन । नैष्कर्म्याची सिद्धि । लाभे चि ना कधीं । कर्महीना ।।८०।।
सांडोनि स्वकर्म । *नैष्कर्म्य पावणें । वायां हें बोलणें । मूर्खत्वाचें ।।८१।।
पैलतीरा जावें । ऐसी जरी आस । त्यजोनि नावेस । कैसें होय ।।८२।।

---

१ स्पष्ट केले.　२ आचरतात.　३ (शिजवून) तयार.　४ तयार करावयाचा.　५ न करून.
* परिशिष्ट पहा.

वाटे तृप्त व्हावें । करोनि भोजन । तरी कां गा अन्न । रांधूं नये ? ॥८३॥
किंवा रांधिलेलें । सेवावें ना जरी । तृप्त व्हावें तरी । कैसें सांग ॥८४॥
[१] निरिच्छता नाहीं । लाभली जोंवरी । सुटे ना तोंवरी । व्यवहार ॥८५॥
मग तो साधक । होतां [२]आत्मतुष्ट । राहे खटपट । स्वभावें ती ॥८६॥
म्हणोनि सांगतों । ऐक आतां पार्था । जयालागीं आस्था । *नैष्कर्म्याची ॥८७॥
तयानें आपुलें । कर्म जें उचित । सोडूं नये येथ । सर्वथैव ॥८८॥
आणि निजेच्छेनें । कर्म स्वीकारावें । तरी च तें व्हावें । ऐसें आहे ? ॥८९॥
किंवा सोडावें तें । ऐसें मनीं आलें । तरी का सुटलें । ऐसें होय ? ॥९०॥
बोलणें हें ऐसें । [३]वाउगें वाह्यात । आतां जें यथार्थ । तें चि पाहें ॥९१॥
कर्म हें अर्जुना । सोडितां सुटे ना । संदेह तो मना । नको येथें ॥९२॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत ।
कार्यते ह्यवश: कर्म सर्व: प्रकृतिजैर्गुणै: ॥५॥

कर्म मी करीन । किंवा तें सोडीन । बोलणें हें जाण । अज्ञानाचें ॥९३॥
जोंवरी अर्जुना । * मायेचा आश्रय । तोंवरी तें होय । स्वभावें चि ॥९४॥
प्रकृतीपासोन । होती जे * त्रिगुण । तयांच्या आधीन । कर्मजात ॥९५॥
पार्था योग्य कर्में । जेवढीं म्हणोन । दिलीं तीं सोडोन । हटाग्रहें ॥९६॥
तरी स्वाभाविक । इंद्रियांचें कार्य । नष्ट होतें काय । सांगें मज ॥९७॥
काय कर्णद्वारा । ऐकणें थांबलें । तेज का लोपलें । नेत्रांतील ॥९८॥
[४]नासिकेचें [५]रंध्र । बुजोनि का गेलें । घेईनासें झालें । परिमळ ॥९९॥
सांगें * प्राणापान । खेळती ना देहीं । मति झाली काई । निर्विकल्प ॥१००॥
न लागे का भूक । न लागे तहान । गेल्या मावळोन । सर्व इच्छा ? ॥१०१॥
आतां निद्रेमाजीं । न पडे का स्वप्न । न येई फिरोन । जागृती ती ॥१०२॥
किंवा सांगें चालों । विसरले पाय । असो, ठेले काय । जन्म-मृत्यु ? ॥१०३॥
सर्व हे व्यापार । थांबती ना मग । सोडिलें तें सांग । काय आतां ॥१०४॥
म्हणोनि अर्जुना । जे का मायावंत । तयां नाहीं येथ । कर्म-त्याग ॥१०५॥

---

१ कोणती हि इच्छा नसणें.　२ आत्मानंदांत संतुष्ट.　३ व्यर्थ.　४ नाकाचें.　५. भोक.

कर्म हें निपजे । प्रकृतीच्या गुणें । पराधीनपणें । पंडु-सुता ।।१०६।।
तरी तें करीन । किंवा तें सोडीन । वायां अभिमान । अंतरीं हा ।।१०७।।
देखें [1] रथारूढ । होवोनि केवळ । बैसावें निश्चळ । जरी तेथें ।।१०८।।
तरी रथासंगें । पराधीनपणें । घडावें हिंडणें । जैसें मग ।।१०९।।
किंवा [2] शुष्क-पत्र । जैसें का निचेष्ट । भ्रमे आकाशांत । वायूसंगें ।।११०।।
तैसा प्रकृतीचा । घेवोनि आसरा । कर्मेंद्रियद्वारा । निरंतर ।।१११।।
तो हि धनंजया । [3] व्यापारे त्रिगुणीं । होय जरी कोणी । कर्म-त्यागी ।।११२।।
म्हणोनि जोंवरी । प्रकृतीचा संग । न हो कर्म-त्याग । तोंवरी तो ।।११३।।
असोनियां ऐसें । करूं जे म्हणती । आग्रह चि अंतीं । उरे त्यांचा ।।११४।।

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचार: स उच्यते ।।६।।

उचित तें कर्म । सांडोनि धांवती । कर्मातीत स्थिति । गांठावया ।।११५।।
परी * कर्मेन्द्रिय-। [4] प्रवृत्ति सर्वथा । मूढपणें पार्था । निरोधून ।।११६।।
तयां कर्म-त्याग । कदापि न घडे । मन कर्मीं जडे । म्हणोनियां ।।११७।।
परि बाह्यात्कारीं । त्यागाचा जो डौल । दाविती तें [5] फोल । दैन्य जाण ।।११८।।
ऐसे कोणी मूढ । वर्तती जे येथ । जाण ते निभ्रांत । भोगासक्त ।।११९।।
आतां ऐकें तुज । प्रसंगें सांगेन । अर्जुना लक्षण । निष्कामाचें ।।१२०।।

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियै: कर्मयोगमसक्त: स विशिष्यते ।।७।।

जो का पार्था गूढ । * परब्रह्मपदीं । ठेवी दृढबुद्धि । अंतरांत ।।१२१।।
आणि जैसे लोक । वागती संसारीं । तैसा बाह्यात्कारीं । वर्ततसे ।।१२२।।
इंद्रियांसी आज्ञा । करी ना किरीटी । धरी ना जो भीति । विषयांची ।।१२३।।
आणि प्राप्त कर्म । जें जें का उचित । तें तें नाहीं जात । अव्हेरोनि ।।१२४।।
कर्मेंद्रियें कर्मीं । वावरतां पार्था । तयांसी सर्वथा । आवरी ना ।।१२५।।
परी तेथें [3] ऊर्मि । होय जी निर्माण । तेणें ज्याचें मन । झांकोळेना ।।१२६।।

---

१ रथावर बसलेला. २ सुकें पान. ३ वावरतों. ४ क्रिया; व्यापार. ५ व्यर्थ. ६ उसळी; वृत्ति.
* परिशिष्ट पहा.

कामनेमाझारीं । गुंतोनि न जाय । न जो लिप्त होय । मोह-मळें ।।१२७।।
जैसें [१] पद्‌म-पत्र । राहोनि जळांत । भिजे ना तयांत । लेशमात्र ।।१२८।।
तैसा * उपाधींत । नव्हे लिप्त जो का । सकळांसारिखा । दिसोनियां ।।१२९।।
[२] तोय-संगे जैसें । भानु-बिंब भासे । तैसा तो हि दिसे । संसारांत ।।१३०।।
आणिकांसारिखा । सर्वसाधारण । दिसे बाहेरून । पाहूं जातां ।।१३१।।
परी [३] अभ्यंतरीं । निर्धारितां साची । नाकळे तयाची । आत्म-स्थिति ।।१३२।।
धनंजया ऐशा । लक्षणांनीं युक्त । आसक्तिरहित । असे जो का ।।१३३।।
ओळखावा तो चि । मुक्त तो चि योगी । वर्णिती जो जगीं । विशेषत्वें ।।१३४।।
तूं हि पार्था व्हावें । ऐसा चि निजांगें । म्हणोनि हें सांगें । तुजप्रति ।।१३५।।
आवरोनि मन । अर्जुना केवळ । होईं तूं निश्चळ । अंतर्यामीं ।।१३६।।
मग आपुलाले । करोत व्यापार । सुखानें साचार । * कर्मेन्द्रियें ।।१३७।।

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मण: ।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मण: ।।८।।

सांडोनि स्वकर्म । कर्मातीत व्हावें । हें तों [४] न संभवे । संसारीं ह्या ।।१३८।।
मग [५] शास्त्रबाह्य । करावें का कर्म । सोडावा का धर्म । सांगें आतां ।।१३९।।
म्हणोनियां पार्था । प्रसंगानुसार । कर्म जें साचार । प्राप्त होय ।।१४०।।
तें तुवां विहित । आचरावें येथ। परी फलाशेंत । गुंतूं नये ।।१४१।।
निष्काम कर्माचें । नेणसी कौतुक । सोडवी जें देख । स्वभावें चि ।।१४२।।
अधिकार तैसा । सेवितां स्वधर्म । होय तें चि कर्म । मोक्षप्रद ।।१४३।।

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धन: ।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्ग: समाचर ।।९।।

स्वधर्म जो तो चि । नित्य-यज्ञ जाण । घडे अनुष्ठान । त्याचें जेथें ।।१४४।।
तेथें मग नाहीं । पापाचा प्रवेश । तुटे कर्म-पाश । आपोआप ।।१४५।।
स्वधर्म हा सांडे । कुकर्म आवडे । तेव्हां बंध पडे । सांसारिक ।।१४६।।
म्हणोनि अर्जुना । स्वधर्माचरण । अखंड यजन । करी जो हें ।।१४७।।

---

१ कमळाचे पान. २ पाणी. ३ अंत:करणांत. ४ होणार नाहीं. ५ शास्त्राच्या विरुद्ध.
* परिशिष्ट पहा.

तया याज्ञिकासि । कर्माचें बंधन । घडे ना तें जाण । कल्पान्तीं हि ॥१४८॥
हा चि नित्ययज्ञ । घडे ना म्हणोन । लोक पराधीन । पडे बंधीं ॥१४९॥
ह्या चि विषयींची । कथा आतां एक । सांगेन ती ऐक । धनुर्धरा ॥१५०॥

सहयज्ञा: प्रजा: सृष्ट्वा पुरोवाच प्रजापति: ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥१०॥

केली ब्रह्मदेवें । सृष्टि-संस्थापना । निर्मिली अर्जुना । प्रजा सर्व ॥१५१॥
तेव्हां स्वधर्माचा । नित्ययज्ञ भला । लावोनियां दिला । प्रजेसी त्या ॥१५२॥
परी जाणेना ती । यज्ञाचें त्या [१] वर्म । कीं तो अति सूक्ष्म । म्हणोनियां ॥१५३॥
तेव्हां प्रजा सर्व । ब्रह्मदेवाप्रति । करोनि विनंति । म्हणे देवा ॥१५४॥
कशाचा आधार । सांग येथें आम्हां । मग [२] पद्मजन्मा । काय बोले ॥१५५॥
म्हणे ऐका तुम्हां । स्वधर्मानुसार । दिला जो आधार । स्वधर्माचा ॥१५६॥
त्या चि स्वधर्माची । करा उपासना । सफळ कामना । तेणें मग ॥१५७॥
नको व्रत नेम । पीडणें देहासी । न जावें तीर्थासी । दूर कोठें ॥१५८॥
किंवा योगादिक । साधनें नकोत । पूजाया दैवत । नको दुजें ॥१५९॥
ना तरी [३] सकाम । नको [४] आराधना । नकोत ते नाना । मंत्रतंत्र ॥१६०॥
सर्वथा हें कांहीं । नको करायास । सेवा स्वधर्मास । अनायासें ॥१६१॥
करी पति-सेवा । पतिव्रता जैसी । तैसे भजा ह्यासी । निष्कामत्वें ॥१६२॥
पूजनीय एक । हा चि तुम्हांप्रति । ऐसें प्रजापति । तेव्हां बोले ॥१६३॥
एकभावें जरी । सेवाल स्वधर्म । कामधेनुसम । होईल हा ॥१६४॥
करील तो मग । तुमचें रक्षण । अहो प्रजाजन । निरंतर ॥१६५॥

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु व: ।
परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ ॥११॥

सेवितां स्वधर्म । देवता सकळ । तोष पावतील । स्वभावें चि ॥१६६॥
मग जें जें कांहीं । इच्छाल मानसीं । देतील तुम्हांसी । तें तें सर्व ॥१६७॥
निजधर्म-यज्ञें । उपासितां येथें । देव-देवतांतें । सकळ हि ॥१६८॥

---

१ खुबी; रहस्य. २ ब्रह्मदेव. ३ फलाशेंत गुंतून केलेली. ४ उपासना.

मग [१] योग-क्षेम । तुमचा तीं पूर्ण । निश्चयेंकरोन । वाहतील ॥१६९॥
ऐशा परी तुम्ही । देवांतें भजाल । देव तोषतील । तुम्हांवरी ॥१७०॥
प्रेमाचे संबंध । ऐसे परस्पर । जेव्हां निरंतर । जुळतील ॥१७१॥
तेव्हां तुम्ही जें जें । करावें म्हणाल । सिद्ध तें होईल । स्वभावें चि ॥१७२॥
आणि जें जें कांहीं । मानसीं धराल । पूर्ण तें होईल । अनायासें ॥१७३॥
कराल ती आज्ञा । पाळली जाईल । तुम्हांसी लाभेल । [२] वाचासिद्धि ॥१७४॥
महा-ऋद्धि त्या हि । जोडोनियां हात । राहतील तेथ । पुढें उभ्या ॥१७५॥
जैसी फळभारें । वसंताचे द्वारीं । नित्य सेवा करी । वन-शोभा ॥१७६॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ॥१२॥

सर्व सुखांसवें । भाग्य मूर्तिमंत । येईल शोधीत । तुम्हां तैसें ॥१७७॥
स्वधर्माचे ठायीं । राहोनि तत्पर । वर्ताल साचार । जरी येथें ॥१७८॥
तरी ऐसे सर्व । भोगोनियां भोग । व्हाल तुम्ही मग । पूर्णकाम ॥१७९॥
जो का सर्वैश्वर्यें । वागेल मदांध । [३] भोगास्वादा [४] लुब्ध । होवोनियां ॥१८०॥
देव-देवतांनीं । यज्ञें संतोषून । संपत्ति संपूर्ण । दिली जी ही ॥१८१॥
त्या चि संपत्तीनें । सर्वेश्वरालागीं । भजेल ना जगीं । स्वधर्मे जो ॥१८२॥
न जो अग्निमुखीं । देईल हवन । देवता-पूजन । करील ना ॥१८३॥
आणि प्राप्त वेळीं । ब्राह्मणासी अन्न । देईल ना मान । अतिथीसी ॥१८४॥
ज्ञाति-बांधवांसी । न जो तोषवील । आणि उपेक्षील । गुरुभक्ति ॥१८५॥
स्वधर्माचरण । सांडोनि सकळ । होईल केवळ । भोगासक्त ॥१८६॥
जगीं मी च एक । संपन्न कीं मोठा । बाळगील ताठा । ऐसा जो का ॥१८७॥
तयालागीं पुढें । असे मोठें भय । जेणें सर्व जाय । मिळालें तें ॥१८८॥
आणि प्राप्त भोग । भोगावयातें हि । सर्वथा तो होई । असमर्थ ॥१८९॥
संपतां आयुष्य । मग शरीरांत । चेतना रहात । नाहीं जैसी ॥१९०॥
ना तरी नांदेना । लक्ष्मी जिया परी । करंट्याच्या घरीं । क्षणमात्र ॥१९१॥

---

१ निर्वाह; चरितार्थ. २ बोललेलें खरें होण्याचें सामर्थ्य. ३ भोगांच्या गोडीला. ४ भुललेला.

तैसा स्वधर्माचा । जरी लोप होय । पावती [1] विलय । सर्व सुखें ॥१९२॥
सोडितां *स्वधर्म । स्वातंत्र्य हारपे । दीपासवें लोपे । तेज जैसें ॥१९३॥
ब्रह्मदेव म्हणे । ऐका प्रजाजन । स्वधर्म सोडोन । वर्तेल जो ॥१९४॥
तयाचें सर्वस्व । हरील तो काळ । दंडील केवळ । चोरासी त्या ॥१९५॥
मग सर्व पापें । वेढिती तयातें । रात्रीं स्मशानातें । भुतें जैसीं ॥१९६॥
त्रिलोकींचे दु:ख । नानाविध दोष । दैन्य तें [2] अशेष । राहे तेथें ॥१९७॥
ऐका प्राणि-गण । तया उन्मत्ताची । ऐसी दशा साची । होय तेव्हां ॥१९८॥
मग आक्रंदोनि । मांडिला आकांत । तरी न हो मुक्त । *कल्पान्तीं हि ॥१९९॥
म्हणोनियां करूं । नये स्वैराचार । स्वधर्म साचार । सोडोनियां ॥२००॥
चतुर्मुख ब्रह्मा । सृष्ट्यारंभीं जाणा । ऐसें प्रजाजना । उपदेशी ॥२०१॥
देखा जळचरां । जैसें जळाविण । ओढवे मरण । तत्काळ चि ॥२०२॥
स्वधर्मावांचोनि । तैसी दशा होय । म्हणोनि ही सोय । सोडूं नये ॥२०३॥
उचित स्वकर्मीं । असावें तत्पर । हें चि वारंवार । सांगें तुम्हां ॥२०४॥

यज्ञशिष्टाशिन: सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै: ।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥१३॥

[3] विहिताचरणें । प्राप्त संपत्तीतें । वेंची जो का येथें । निष्कामत्वें ॥२०५॥
गुरु गोत्र अग्नि । ह्यांची आराधना । प्रसंगीं ब्राह्मणा । पूजितसे ॥२०६॥
फेडी पितृऋण । भावें करोनियां । श्राद्धादिक क्रिया । पर्वकाळीं ॥२०७॥
स्वधर्म-यज्ञानें । यज्ञेश्वराप्रति । उचित आहुति । देवोनियां ॥२०८॥
मग स्वभावतां । राहिलें जें शेष । त्यांत चि संतोष । मानोनियां ॥२०९॥
कुटुंबासहित । आपुलिया घरीं । सेवितां तें [4] हरी । सर्व दोष ॥२१०॥
राहिलें यज्ञान्तीं । तें चि सेवी अन्न । होय तो म्हणोन । पाप-मुक्त ॥२११॥
जैसा महारोगी । सेवितां अमृत । होय रोग-मुक्त । आपोआप ॥२१२॥
किंवा ज्ञात्यालागीं । नसे भ्रांतिलेश । तैसा तो निर्दोष । [5] शेष-भोगी ॥२१३॥
म्हणोनि स्वधर्में । जें जें संपादावें । सर्व तें वेंचावें । स्वधर्में चि ॥२१४॥

---

१ पूर्ण नाश. २ संपूर्ण. ३ योग्य वागणुकीनें. ४ नाहींसें करतें. ५ उरलेलें उपभोगणारा.

स्वधर्म-यज्ञान्तीं । उरेल जें मग । घ्यावा त्याचा भोग । संतोषानें ॥२१५॥
स्वधर्म सांडोनि । वर्तूं नये पार्था । ऐसी आद्य कथा । कृष्ण सांगें ॥२१६॥
मानिती जे कोणी । देह चि आपण । विषय संपूर्ण । भोग्य वस्तु ॥२१७॥
ह्याहून आणिक । स्मरती ना कांहीं । भ्रांत झाले पाहीं । अहंकारें ॥२१८॥
जोडली संपत्ति । यज्ञ-सामुग्री ती । स्वयें भोगूं जाती । नेणोनि हें ॥२१९॥
रुचे इंद्रियांसी । ऐसा स्वयंपाक । चवदार देख । करोनियां ॥२२०॥
न करितां यज्ञ । जणूं पातकें च । भक्षिती ते साच । अन्नरूपें ॥२२१॥
असे जी का सर्व । आपुली संपत्ति । यज्ञसामुग्री ती । मानोनियां ॥२२२॥
*निज-धर्मरूप । यज्ञ आचरोन । करावी अर्पण । ईश्वरासी ॥२२३॥
परी हें सांडोनि । स्वतांसाठीं मूर्ख । करविती पाक । नानाविध ॥२२४॥
जेणें यज्ञसिद्धि । [१] परेशातें तोष । अन्न तें विशेष । मानावें हें ॥२२५॥
पार्था, म्हणावें ना । ह्यातें साधारण । अन्न हें तों जाण । ब्रह्मरूप ॥२२६॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥१४॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥१५॥

सर्व विश्वातें ह्या । अन्न चि जीवन । अन्न [२] संवर्धन । प्राणियांचें ॥२२७॥
पर्जन्यापासोन । अन्नाची उत्पत्ति । यज्ञीं हो [३] संभूति । पर्जन्याची ॥२२८॥
जाण [४] कर्मोद्भव । यज्ञ तो केवळ । कर्मासी त्या मूळ । [५] शब्दब्रह्म ॥२२९॥
अविनाशी एक । जें का परब्रह्म । तेथोनियां जन्म । शब्दब्रह्मा ॥२३०॥
ऐसें शब्दब्रह्मीं । धनंजया जाण । गोंविलें संपूर्ण । चराचर ॥२३१॥
म्हणोनियां यज्ञ । कर्माची जो मूर्ति । तेथें राहे * श्रुति । निरंतर ॥२३२॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥१६॥

[६] संक्षेपें ही ऐसी । मूळ परंपरा । सांगितली वीरा । यज्ञाची ह्या ॥२३३॥

---

१ परमेश्वराला. २ वाढ. ३ निर्माण होणे. ४ कर्मातून निर्माण झालेला. ५ वेद. ६ थोडक्यात.
* परिशिष्ट पहा.

समूळ उचित । स्वधर्म-यज्ञातें । आचरे ना येथें । उन्मत्त जो ॥२३४॥
करोनि [1] कुकर्में । इंद्रियें केवळ । लाडावोनि काळ । वायां वेंची ॥२३५॥
अर्जुना तो जाण । पातकांची रास । भार तो भूमीस । सर्वथैव ॥२३६॥
जन्मकर्म सारें । तयाचें निष्फळ । जैसें का [2] अकाळ । अभ्र आलें ॥२३७॥
शेळियेचे गळां । स्तन जैसे वायां । तैसें धनंजया । जिणें त्याचें ॥२३८॥
म्हणोनि स्वधर्म । सोडूं नये देख । भजावा हा एक । सर्वभावें ॥२३९॥
देहासवें आला । कर्तव्याचा ओघ । कां गा मग त्याग । स्वकर्माचा ॥२४०॥
लाहोनियां देह । प्राप्त कर्मीं [3] खंती । जे का बाळगिती । अज्ञानी ते ॥२४१॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥१७॥

* आत्मस्वरूपीं च । जो का रममाण । असे परिपूर्ण । अखंडित ॥२४२॥
देखें तो चि एक । कर्में नव्हे लिप्त । वावरोनि येथ । देहधर्मीं ॥२४३॥
कीं तो सर्वथैव । पावे समाधान । होतां आत्मज्ञान । अंतर्यामीं ॥२४४॥
तरी [4] कृतकृत्य । स्वभावें म्हणोन । [5] कर्मसंगांतून । मुक्त झाला ॥२४५॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥१८॥

तृप्ति होतां पार्था । जैसा आपोआप । संपे खटाटोप । साधनांचा ॥२४६॥
तैसें आत्मानंदीं । होतां चि संतुष्ट । आटे खटपट । कर्माची ती ॥२४७॥
जोंवरी अंतरीं । नाहीं आत्मज्ञान । कर्म हें साधन । तोंवरी च ॥२४८॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥१९॥

म्हणोनियां सर्व । सोडोनि कामना । आवरोनि मना । आपुलिया ॥२४९॥
तुवां आचरावा । स्वधर्म उचित । सर्वभावें येथ । धनंजया ॥२५०॥
आपुलें * स्वकर्म । * निष्कामत्वें केलें । तत्त्वतां ते झाले । मुक्त येथें ॥२५१॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।

---

१ दुष्कृत्यें. २ अवेळीं. ३ लाज; खेद. ४ कर्तव्य पूर्ण केलेला. ५ कर्माच्या संसर्गापासून.
* परिशिष्ट पहा.

लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥२०॥

न सोडितां कर्मे । देखें * जनकादिक । जगीं मोक्ष-सुख । पावले गा ॥२५२॥
म्हणोनियां आस्था । असावी कर्मांत । तेणें होय हित । आणिक हि ॥२५३॥
आपुल्या आचारें । लोकांसी वळण । लागोनियां जाण । [१] प्रसंगें चि ॥२५४॥
मग पार्था त्यांची । टळेल ती हानि । होय जी [२] निदानीं । कर्म-त्यागें ॥२५५॥
अगा आत्मज्ञानें । होवोनि [३] कृतार्थ । पावले जे येथ । निष्कामत्व ॥२५६॥
तयांसी हि उरे । कर्तव्य उचित । * लोकसंग्रहार्थ । धनंजया ॥२५७॥
डोळस तो जैसा । पुढें चाले नीट । दाखवीत वाट । आंधळ्यासी ॥२५८॥
तैसा निजधर्म । स्वयें आचरोन । नेणत्यांलागोन । दाखवावा ॥२५९॥
जाणत्यांनीं ऐसें । करावें ना जरी । कळावें तें तरी । कैसें [४] मूढां ॥२६०॥
जे कां अज्ञ जन । तयांनीं हा मार्ग । कैसा बरें सांग । ओळखावा ॥२६१॥

यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरो जन: ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥२१॥

येथें गुरुजन । जें जें आचरती । तया नांव देती । धर्म ऐसें ॥२६२॥
सामान्य सकळ । नेणते जे लोक । अनुष्ठिती देख । मग तें चि ॥२६३॥
असे ऐसा ओघ । स्वभावें हा येथें । म्हणोनि कर्मातें । सोडूं नये ॥२६४॥
आचरावें लागे । विशेषेंकरोन । जे का संतजन । तयांतें चि ॥२६५॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥२२॥

काय सांगू आतां । आणिकांच्या गोष्टी । माझी च [५] रहाटी । देखें पार्था ॥२६६॥
काय मजवरी । पडलें संकट । किंवा कांहीं [६] आर्त । मनीं माझ्या ॥२६७॥
म्हणोनि स्वधर्म । आचरें मी येथें । ऐसें जरी वाटे । तुजलागीं ॥२६८॥
तरी * गुणैश्वर्य-। संपन्न आणिक । दुजा नाहीं देख । जगीं कोणी ॥२६९॥
ऐसें माझ्या अंगीं । सामर्थ्य अपार । अर्जुना साचार । जाणसी तूं ॥२७०॥
झाला * गुरु-पुत्र । सागरीं जो मृत । करोनि जिवंत । आणिला तो ॥२७१॥

---

१ ओघानें. २ शेवटीं. ३ सर्व हेतु पूर्ण झालेला. ४ नेणत्यांना. ५ वागणूक; रीत. ६ इच्छा.
* परिशिष्ट पहा.

देखिलासी ऐसा । माझा पराक्रम । तो मी करीं कर्म । *स्वस्थचित्तें ।।२७२।।

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।।२३।।

जैसा फलाशेंत । गुंतोनियां नर । कर्मीं निरंतर । वर्ततसे ।।२७३।।
तैसा देखें मी हि । वर्तें स्वधर्मांत । परी अंतरांत । अनासक्त ।।२७४।।
करावया कर्म । एक चि कारण । आमुच्या आधीन । जे का लोक ।।२७५।।
न व्हावें तयांनीं । येथें [१]कर्मभ्रष्ट । आचरावें नीट । स्वधर्मातें ।।२७६।।

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ।।२४।।

आम्ही पूर्णकाम । होवोनियां साच । *आत्मस्वरूपींच । राहूं जरी ।।२७७।।
तरी कैसे प्राणी । [२]भवार्णवांतून । जातील तरोन । सांगें मज ।।२७८।।
तयांनीं आमुचें । पाहोनि वर्तन । स्वधर्माची खूण । ओळखावी ।।२७९।।
लोक-स्थिति ऐसी । स्वभावें सकळ । नाशिली केवळ । ऐसें होय ।।२८०।।
म्हणोनि ह्या लोकीं । सामर्थ्यसंपन्न । ज्ञानें परिपूर्ण । होय जो का ।।२८१।।
तेणें धनंजया । विशेषेंकरोन । स्वकर्म सांडोन । वर्तों नये ।।२८२।।

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ।।२५।।

कर्म–फलीं पार्था । ठेवोनियां दृष्टी । सकाम वर्तती । लोक जैसे ।।२८३।।
तैसें चि रहावें । दक्ष स्वकर्मांत । कामनारहित । होवोनि हि ।।२८४।।
कीं ही [३]लोकसंस्था । सकळ सर्वथा । निरंतर पार्था । रक्षणीय ।।२८५।।
म्हणोनि *स्वधर्म । आचरोनि चांग । सर्वांसी सन्मार्ग । दाखवावा ।।२८६।।
[४]लोकविलक्षण । करोनि वर्तन । न व्हावें आपण । अलौकिक ।।२८७।।

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसङ्गिनाम् ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ।।२६।।

मूल जें सायासें । करी स्तन-पान । तयासी पक्वान्न । काय होय ।।२८८।।

---

१ धर्मकर्माविषयी उदासीन. २ संसारसागरांतून. ३ समाजव्यवस्था. ४ लोकांहून वेगळे.
* परिशिष्ट पहा.

ADA3-56-78F

D:\Dyaneshwari_2007\ADA3_56-78....69

दिलें तरी कैसें । येईल [१] भक्षाया । म्हणोनि तें तया । देऊं नये ॥२८९॥
तैसी सर्वथैव । कर्मीं [२] अपात्रता । येथें पंडु-सुता । असे जयां ॥२९०॥
तयां कौतुकें हि । *नैष्कर्म्याची खूण । उघड करोन । दावूं नये ॥२९१॥
तेथ सत्कर्माचें । लावावें वळण । प्रशंसा करोन । वारंवार ॥२९२॥
स्वयें आचरोन । दाखवावें तें च । *निष्काम जे साच । तयांनीं हि ॥२९३॥
वागतां ते कर्मीं । लोक-संग्रहार्थ । पावती ना तेथ । कर्म-बंध ॥२९४॥
बहुरूपी जैसे । नटोनियां अंगें । राजा राणी सोंगें । ऐसीं घेती ॥२९५॥
परी मनीं नाहीं । नरनारीभाव । लोकां हावभाव । दाखवितां ॥२९६॥

प्रकृते: क्रियमाणानि गुणै: कर्माणि सर्वश: ।
अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥२७॥

इतरांचें ओझें । आपुलिया माथां । घ्यावें तरी पार्था । भार होय ॥२९७॥
तैसीं येथें जीं जीं । शुभाशुभ कर्में । निपजती धर्में । प्रकृतीच्या ॥२९८॥
तयांचें कर्तृत्व । [३] मति-भ्रमें साच । आपणाकडे च । घेई मूर्ख ॥२९९॥
सर्वथैव ऐसा । अहंकारारूढ । [४] एकदेशी मूढ । असे जो का ॥३००॥
तयातें कर्माचें । रहस्य हें गूढ । करोनि उघड । दावूं नये ॥३०१॥
असो; पार्था तुज । सांगतों जें हित । देवोनियां चित्त । ऐक आतां ॥३०२॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयो: ।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ॥२८॥

तत्त्वज्ञांच्या ठायीं । नाहीं देहभाव । निपजती सर्व । कर्में जेथें ॥३०३॥
देहाभिमानातें । सांडोनि ते संत । गुणकर्मातीत । होवोनियां ॥३०४॥
भूतव्यवहारा–। पासोनि अलिप्त । सूर्य आकाशांत । राहे जैसा ॥३०५॥
तैसे *साक्षित्वानें । वावरती देहीं । म्हणोनियां नाहीं । कर्म-बंध ॥३०६॥

प्रकृतेर्गुणसंमूढा: सज्जन्ते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥२९॥

प्रकृति-आधीन । होवोनियां [५] वर्ते । *गुणत्रयीं गुंते । सर्वथा जो ॥३०७॥

---

१ खायला. २ अयोग्यता. ३ बुद्धीच्या गोंधळामुळे.
४ संकुचित वृत्तीचा, देहच मी अशी दृढ बुद्धी असलेला. ५ वागतो.

गुणत्रयाधारें । आपुले व्यापार । करिता साचार । इंद्रियें जीं ।।३०८।।
तयांचें तें कर्म । जो का [१] बळें साच । आचरें स्वत:च । ऐसें मानी ।।३०९।।
ऐसा * देहभाव । जयाचा जागृत । तो चि कर्मे लिप्त । होय येथें ।।३१०।।

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युद्ध्यस्व विगतज्वर: ।।३०।।

म्हणोनि उचित । कर्मे तीं आघवीं । मज समर्पावीं । आचरोनि ।।३११।।
परी चित्त-वृत्ति । पार्था निरंतर । ठेवावी [२] सुस्थिर । * आत्मरूपीं ।।३१२।।
आणि हें तों कर्म । तयाचा मी कर्ता । आचरेन आतां । [३] एतदर्थ ।।३१३।।
ऐसा चित्तालागीं । नको अभिमान । येऊं देऊं जाण । सर्वथा तूं ।।३१४।।
तुवां देहासक्त । न व्हावें अर्जुना । सांडाव्या वासना । सकळ हि ।।३१५।।
मग यथोचित । प्रसंगें जे प्राप्त । भोग ते समस्त । भोगावे गा ।।३१६।।
आतां हातामाजीं । धरोनि [४] कोदंड । येथें रथारूढ । होवोनियां ।।३१७।।
वीरवृत्तीचा तूं । आनंदें स्वीकार । करीं गा सत्वर । धनुर्धरा ।।३१८।।
जगामाजीं कीर्ति । करीं [५] वर्धमान । स्वधर्माचा मान । वाढवोनि ।।३१९।।
* भारापासोनी ही । भूमि करीं मुक्त । रणांगणीं दुष्ट । संहारोनि ।।३२०।।
सर्व हि संशय । सांडोनियां आतां । चित्त देईं पार्था । संग्रामीं च ।।३२१।।
संग्रामावांचोन । येथें धनुर्धरा । बोलूं नको वीरा । दुजें कांहीं ।।३२२।।

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवा: ।
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभि: ।।३१।।

जे जे कोणी माझें । यथार्थ हें मत । मानिती अत्यंत । पूज्यभावें ।।३२३।।
ठेवोनियां श्रद्धा । मग पूर्णपणें । काया-वाचा-मनें । [६] अनुष्ठिती ।।३२४।।
सकळ हि कर्मीं । ते ते वावरोत । परी कर्मातीत । ओळख तूं ।।३२५।।
म्हणोनि स्वकर्म । करावें उचित । हें चि हें निश्चित । मत माझें ।।३२६।।

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतस: ।।३२।।

---

१ मुद्दाम; आग्रहाने. २ शांत; दृढ. ३ ह्याकरितां. ४ धनुष्य. ५ वाढणारी. ६ आचरतात.
* परिशिष्ट पहा.

नातरी होवोनि । [१] देहभावीं दृढ । पुरवोनि लाड । इंद्रियांचे ॥३२७॥
अर्जुना, हे माझें । मत अव्हेरोनि । सांडिती लेखोनि । सामान्यत्वें ॥३२८॥
हा तों * अर्थवाद । ऐसी वाचाळता । करोनि तुच्छता । दाविती जे ॥३२९॥
मोह-मद्यें साच । होवोनि ते भ्रांत । झाले विषें व्याप्त । विषयांच्या ॥३३०॥
अज्ञानाच्या [२] पंकीं । बुडोनि ते वायां । गेले धनंजया । निःसंदेह ॥३३१॥
प्रेताहातीं दिलें । रत्न वायां गेलें । व्यर्थ उजाडलें । जन्मांधातें ॥३३२॥
कावळ्यासी जैसा । चंद्रोदय देख । मूढासी विवेक । रुचे ना हा ॥३३३॥
ऐसे जे [३] विन्मुख । झाले * परमार्था । बोलूं नये पार्था । तयांसंगें ॥३३४॥
पतंगा प्रकाश । साहवे ना जैसा । विवेक ना तैसा । रुचे त्यांसी ॥३३५॥
म्हणोनि हें माझें । मत अव्हेरोन । मत्सरेंकरोन । निंदिती ते ॥३३६॥
पतंगें दीपासी । दिलें आलिंगन । अचूक मरण । तरी त्यासी ॥३३७॥
विषयांच्या भोगें । तैसें चि पतन । * स्वरूपापासोन । जीवालागीं ॥३३८॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥३३॥

म्हणोनि ज्ञात्यानें । करूं नये पाहीं । लाड कौतुकें हि । इंद्रियांचे ॥३३९॥
सर्पासवें काय । खेळतां येईल । सिद्धीस जाईल । [४] व्याघ्र-संग ॥३४०॥
सेविलें कौतुकें । जरी * हालाहल । तरी तें जिरेल । कैसें सांग ॥३४१॥
सहजें खेळतां । जरी लागे आग । भडकतां मग । सांवरे ना ॥३४२॥
तैसा इंद्रियांसीं । लाविला जो लळा । परिणामीं भला । नाहीं नाहीं ॥३४३॥
पाहें अर्जुना, ही । पराधीन काया । भोगावे कां वायां । नाना भोग ॥३४४॥
सर्वथा सायास । करोनि आपण । जोडावें जें धन । सकळ हि ॥३४५॥
तेणें अहोरात्र । कां गा प्रतिपाळ । करावा केवळ । देहाचा ह्या ॥३४६॥
देह तंव असे । * पंचभूतात्मक । पावे अंतीं देख । * पंचत्वातें ॥३४७॥
मग तिये वेळीं । कोठें धांडोळावा । केला जो आघवा । खटाटोप ॥३४८॥
म्हणोनि केवळ । देहाचें पोषण । प्रत्यक्ष तो जाण । आत्मघात ॥३४९॥

---

१ देह म्हणजेच मी ह्या भावनेंत. २ चिखलांत. ३ तोंड फिरवलेले. ४ वाघाची संगत.
* परिशिष्ट पहा.

अर्जुना तो घात । टाळावया येथ । नये देऊं चित्त । देह-भोगीं ।।३५०।।

इंन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवथितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ।।३४।।

रुचे इंद्रियांसी । ऐसा चि विषय । भोगितां जो होय । तोष चित्ता ।।३५१।।
[1] सावचोर जैसा । तोंवरी च स्वस्थ । ओलांडीना प्रांत । नगराचा ।।३५२।।
तैसा तो संतोष । वाटे क्षणभरी । परि घात करी । परिणामीं ।।३५३।।
सेवूं नये विष । लागे जरी गोड । अंतीं अवघड । प्राण जातां ।।३५४।।
देखें गळालागीं । लावितां [2] आमिष । मासा भुले त्यास । जैशा रीती ।।३५५।।
तैसी इंद्रियांची । विषय-लालसा । सुखाची [3] दुराशा । दावी जीवा ।।३५६।।
ना कळे माशातें । झांकला तो गळ । करी जो केवळ । प्राण-घात ।।३५७।।
तैसी [4] अभिलाषा । प्राण्यालागीं भूल । घालोनि पाडील । क्रोधाग्नींत ।।३५८।।
मृगालागीं जैसा । घेरितो पारधी । वधावया संधी । साधोनियां ।।३५९।।
भोगसुखाची हि । तैसी च ती स्थिति । म्हणोनि संगति । नको त्याची ।।३६०।।
पार्था काम-क्रोध । घातक हे दोन्ही । आसक्तीपासोनि । संभवति ।।३६१।।
म्हणोनियां नको । नको भोगासक्ति । सर्वथा विस्मृति । पडो तेथें ।।३६२।।
आणि पार्था एक । अंतरीं जिव्हाळा । असावा आगळा । स्वधर्माचा ।।३६३।।

श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।।३५।।

आपुला स्वधर्म । जरी का कठिण । भलें अनुष्ठान । तयाचें चि ।।३६४।।
आणिकाचा धर्म । जरी वाटे चांग । सोडूं नये मार्ग । स्वधर्माचा ।।३६५।।
द्विज झाला दीन । तरी काय त्यानें । सेवावीं पक्वान्नें । शूद्राघरीं ।।३६६।।
अग्राह्य इच्छावें । इच्छिलें हि घ्यावें । केविं आचरावें । अनुचित ।।३६७।।
आणिकांचीं घरें । देखोनि सुंदर । आपुलें [5] तणार । मोडावें का ? ।।३६८।।
आपुली अर्धांगी । कुरूप जाहली । तरी तीच भली । भोग्य जैसी ।।३६९।।
स्वधर्म हा तैसा । असो अवघड । आणि वाटो जड । आचराया ।।३७०।।

---

१ संभावित चोर. २ (गळाला लावलेलें) खाद्य. ३ फोल आशा. ४ विषयांची हांव. ५ गवती झोपडें.

तरी आचरावा । तो चि हें उचित । स्वधर्में चि हित । पर-लोकीं ॥३७१॥
घालितां साखर । दूध लागे गोड । सर्वांसी उघड । अनुभव ॥३७२॥
परी [१] कृमी-दोषें । होतां व्याधिग्रस्त । तें चि विपरीत । कैसें घ्यावें ॥३७३॥
मग हांवभरें । घेतलें तें तरी । नव्हे हितकारी । परिणामीं ॥३७४॥
म्हणोनि आणिकां । जें जें का [२] विहित । आणि अनुचित । आपणासी ॥३७५॥
तें तें सर्वथैव । नाचरावें येथ । पाहों जातां हित । हें चि योग्य ॥३७६॥
स्वधर्माचरणीं । जावो गेला प्राण । तरी हि कल्याण । दोन्ही लोकीं ॥३७७॥
बोलतां चि ऐसें । प्रभु चक्र-पाणी । करी विनवणी । भक्तराज ॥३७८॥
म्हणे देवा तुम्ही । जें हें सांगितलें । तें मीं [३] परिसिलें । सर्व कांहीं ॥३७९॥
तरी आतां येथें । कांहीं अपेक्षित । पुसेन साद्यन्त । सांगा मज ॥३८०॥

अर्जुन उवाच–
अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३६॥

देवा, जाणते हि । कैसे होती भ्रष्ट । सोडोनियां वाट । चालती कां ? ॥३८१॥
जयां ज्ञात्यांलागीं । सर्व कांही ठावें । आकळे स्वभावें । [४] ग्राह्याग्राह्य ॥३८२॥
भ्रष्टती कां ते हि । स्वधर्मापासोन । जाती कां भुलोन । परधर्मा ॥३८३॥
नये निवडितां । बीज आणि भूस । जैसें आंधळ्यास । सर्वथैव ॥३८४॥
डोळसालागीं हि । तैसें क्षणभरी । व्हावें कां हो तरी । सांगा मज ॥३८५॥
करिती जे सर्व– । संग-परित्याग । ते चि घेती भोग । हांवभरें ॥३८६॥
होवोनि विरक्त । स्वीकारिती वन । ते हि परतोन । गांवा येती ॥३८७॥
आसक्तीपासोनि । लपोनि राहती । पाप चुकविती । सर्वस्वीं जे ॥३८८॥
गोंविले ते जाती । त्या चि पापाठायीं । इच्छा नसतां हि । [५] बलात्कारें ॥३८९॥
जीवालागीं ज्याचा । वाटे तिटकारा । तो चि पडे फेरा । विषयांचा ॥३९०॥
चुकवितां त्यांसी । शोधीत ते येती । जीवासी भिडती । ज्ञात्यांच्या हि ॥३९१॥
ज्ञात्यांसी हि कोण । पापामाजीं ओढी । बलात्कार प्रौढी । कोणाची ही ॥३९२॥

---

१ जंतांनी. २ योग्य. ३ ऐकलें. ४ घेण्यास योग्य आणि अयोग्य. ५ जबरीनें.

मज कृपावंत । होवोनियां देवें । सर्व हें सांगावें । पार्थ म्हणे ।।३९३।।

श्रीभगवानुवाच–
काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।।३७।।

तंव तो हृदय–। कमळ-आराम । काम जो निष्काम । योगियांचा ।।३९४।।
म्हणे पुरुषोत्तम । ऐक तें सांगेन । भुलविती कोण । ज्ञात्यांसी हि ।।३९५।।
ते हे *काम-क्रोध । पाहें धनंजया । जयां नाहीं दया । लेशमात्र ।।३९६।।
ह्यांसी मूर्तिमंत । मानिती कृतांत । निष्ठुर अत्यंत । घातक हे ।।३९७।।
ज्ञानरूप निधी–। वरील हे नाग । दरींतील वाघ । विषयांच्या ।।३९८।।
आक्रमितां चांग । भजनाचा मार्ग । [१]रोधिती हे मांग । मारेकरी ।।३९९।।
देहरूपी दुर्ग । त्याचे हे दगड । हे चि [२]गावकोंड । इंद्रियांचें ।।४००।।
सर्व जगासी हे । टाकिती दडपून । मोहादिकरोन । साधनांनीं ।।४०१।।
जाण हे आसुरी । संपत्ति संपूर्ण । रजोगुणांतून । उद्भवती ।।४०२।।
लालन-पालन । करोनियां भलें । ह्यांसी वाढविलें । *अविद्येनें ।।४०३।।
तमोगुणालागीं । बहु प्रिय झाले । जरी हे जन्मले । रजांतून ।।४०४।।
तमोगुणें ह्यांसी । दिलें [३]निजपद । संमोह-प्रमाद–। रूप जें का ।।४०५।।
पाहें जीविताचे । वैरी हे म्हणोन । ह्यांसी भला मान । यमलोकीं ।।४०६।।
आमिषाच्या घांसा–। लागीं ह्यांसी सारें । विश्व हि न पुरे । ऐसी भूक ।।४०७।।
घोर संहारक । ह्यांचा हा व्यापार । चालवी अपार । आशा देख ।।४०८।।
जियेच्या मुठींत । चौदा हि भुवनें । सहज लीलेनें । सामावती ।।४०९।।
ऐसी शक्तिशाली । भ्रांति आवडती । बहीण धाकुटी । आशेची ती ।।४१०।।
खेळतां खेळतां । पाहें लोकत्रय । कौतुकें चि खाय । जी का भ्रांति ।।४११।।
तियेच्या दास्यत्वें । सामर्थ्यसंपन्न । होवोनियां जाण । जागे [४]तृष्णा ।।४१२।।
असो; मिळे ह्यांसी । मोहाघरीं मान । ऐसें [५]महिमान । थोर ह्यांचें ।।४१३।।
कौतुकें जगासी । नाचवी चौफेर । ऐसा *अहंकार । बळी जो का ।।४१४।।

---

*परिशिष्ट पहा. १ अडवतात. २ गावाभोवतालचें कुंपण. ३ स्वत:ची गादी. ४ हांव. ५ मोठेपणा.

तयाची तों चाले । देवाण-घेवाण । ह्यांच्यासंगें जाण । निरंतर ।।४१५।।
तेवीं चि सत्याचा । कोथळा काढून । दुष्कृत्यांचें तृण । भरी तेथें ।।४१६।।
ऐशापरी दावी । सत्याचा आभास । दंभ ऐसें ज्यास । बोलती गा ।।४१७।।
तया दंभालागीं । प्रसिद्धि आगळी । ह्यांनीं च ती दिली । जगामाजीं ।।४१८।।
पतिव्रता शांति । ह्यांनीं नागवून । ममता-मांगीण । शृंगारिली ।।४१९।।
मग तियेलागीं । हाताशीं धरोन । निर्मळ सज्जन । भ्रष्टविले ।।४२०।।
नष्ट केलें ह्यांनीं । विवेकालागोन । काढिलें सोलून । वैराग्यातें ।।४२१।।
[1] निग्रहाची मान । टाकिली मोडून । खांडिले तें वन । संतोषाचें ।।४२२।।
टाकिला पाडोन । गड धैर्यरूप । उपटिलें रोप । आनंदाचें ।।४२३।।
ह्यांनीं [2] बोधांकुर । टाकिले खुटोन । सुखातें संपूर्ण । नष्ट केलें ।।४२४।।
*तापत्रयरूप । विस्तवाचे झोत । बळें अंतरांत । ओतिले गा ।।४२५।।
देहासवें पाहें । होवोनि उत्पन्न । जीवासी जडोन । राहिले हे ।।४२६।।
परि शोधितां हि । नाहीं सांपडत । जेथें टेंकी हात । ब्रह्मा तो हि ।।४२७।।
चैतन्याशेजारीं । असे ह्यांचा वास । ज्ञानाच्या पंक्तीस । बैसती हे ।।४२८।।
म्हणोनि हे होतां । घातासी प्रवृत्त । नाहीं आटोपत । कोणातें हि ।।४२९।।
हे तों जळाविण । जीवा बुडविती । तेविं चि जाळिती । आगीविण ।।४३०।।
न बोलतां शब्द । राहती लपोन । घेती कवळोन । प्राणियासी ।।४३१।।
जाण शस्त्राविण । साधिती हे घात । तेविं बांधितात । दोराविण ।।४३२।।
जाणत्याची तरी । कापिती हे मान । प्रतिज्ञा करोन । धनुर्धरा ।।४३३।।
हे तों [3] पंकाविण । कैसे रुतविती । आणि गुंतविती । फांसाविण ।।४३४।।
राहती हे खोल । अंतरामाझारीं । म्हणोनियां भारी । कोणातें हि ।।४३५।।

धूमेनाऽऽव्रियते वह्निर्यथाऽऽदर्शो मलेन च ।
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ।।३८।।

सदा सर्वकाळ । चंदनाची मुळी । भुजंगें वेढिली । असे जैसी ।।४३६।।
किंवा जैसी नित्य । गर्भस्थालागोनि । असे [4] गवसणी । वेष्टनाची ।।४३७।।

---

१ (मन) ताब्यांत ठेवण्याची. २ ज्ञानरूपी कोंभ. ३ चिखलाशिवाय. ४ आवरण; खोळ.
* परिशिष्ट पहा.

तेजाविण भानु । अग्नि धुराविण । नसे [1] मळहीन । [2] दर्पण हि ।।४३८।।
तैसें पार्था आम्ही । देखिलें ना ज्ञान । कामक्रोधाविण । एकलें चि ।।४३९।।

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ।।३९।।

किंवा बीजालागीं । कोंड्याचें वेष्टन । स्वभावतां जाण । असे जैसें ।।४४०।।
तैसें ज्ञान तरी । निर्मल अलिप्त । परी [3] आच्छादित । काम-क्रोधें ।।४४१।।
म्हणोनि [4] अगाध । होवोनि राहिलें । सर्वथा नाकळे । जीवासी तें ।।४४२।।
आधीं काम-क्रोध । जिंकोनियां मग । मेळवावें चांग । ज्ञान जरी ।।४४३।।
तरी सर्वथैव । पार्था, पराभूत । नाहीं च हे होत । *राग-द्वेष ।।४४४।।
ह्यांसी च तें बळ । पडे उपयोगी । आणावें जें अंगीं । जिंकावया ।।४४५।।

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ।।४०।।

अग्निलागीं जैसें । साहाय्य सर्पण । तैसी स्थिति जाण । येथें होय ।।४४६।।
जिंकावया जे जे । योजावे उपाय । करिती साहाय्य । ह्यांसी च ते ।।४४७।।
ह्यांसी हटयोगी । आवरूं पहाती । तयांसी जिंकिती । परी हे चि ।।४४८।।
ऐशा हि संकटीं । एक चि साधन । भलें असे जाण । धनुर्धरा ।।४४९।।
तुज साधे तरी । सांगेन तें आतां । ऐक पंडु-सुता । सावधान ।।४५०।।

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ।।४१।।

इंद्रियें चि मूळ । ह्यांचें वस्तीस्थान । जेथोनि निर्माण । होती कर्में ।।४५१।।
तरी तीं सर्वथा । टाकीं [5] निर्दाळून । अंतरीं ठेवोन । *सोऽहं-भाव ।।४५२।।

इंन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्य: परं मन: ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धे: परतस्तु स: ।।४२।।

मग तें सुस्थिर । होवोनियां मन । तुटेल बंधन । बुद्धीचें हि ।।४५३।।
तेणें काम-क्रोधां । वैरीयांसी थारा । उरे चि ना वीरा । अंतरांत ।।४५४।।

---

१ धुळीशिवाय. २ आरसा. ३ झांकलेले. ४ गूढ. ५ नाश करून.

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ।।४३।।
इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ।।३।।

**अंतरापासोन । फिटले निःशेष । तरी ह्यांचा नाश । [१] निःसंदेह ।।४५५।।**
**सूर्याचे किरण । दूर होतां जाण । राहिलें कोठून । * मृगजळ ।।४५६।।**
**तैसें अंतरंग । होतां चि [२] निःसंग । निमाले ते [३] साङ्ग । राग-द्वेष ।।४५७।।**
**जातां प्रीति-द्वेष । ब्रह्मींचें स्वराज्य । संपूर्ण सहज । हाता आलें ।।४५८।।**
**मग तो आपण । भोगी आत्म-सुख । अंतरीं च देख । निरंतर ।।४५९।।**
**ही च * गुरुखूण । घ्यावी ओळखून । संवाद करून । मूकपणें ।।४६०।।**
**जीव-परमात्मा । एक होती जेथ । तेथें तूं [४] संतत । स्थिर राहें ।।४६१।।**
**सकळ सिध्दांचा । राव तो श्रीकांत । ऐसें बोले तेथ । ऐकें राया ।।४६२।।**
**आतां पुन्हा एक । कथा [५] पुरातन । देव जनार्दन । सांगेल तो ।।४६३।।**
**तेथें पंडु-सुत । आशंका घेवोन । कैसा भला प्रश्न । विचारील ।।४६४।।**
**ऐकोनि गंभीर । बोल ते रसाळ । सुखाचा सुकाळ । श्रोतयांसी ।।४६५।।**
**म्हणोनियां भली । येथ श्रोतेजनीं । जागृत करोनि । ज्ञानवृत्ति ।।४६६।।**
**भोगावा संवाद । श्रीहरी-पार्थाचा । म्हणे निवृत्तीचा । ज्ञानदेव ।।४६७।।**

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी
तृतीयोऽध्यायः ।
हरये नमः । हरये नमः । हरये नमः ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ निःसंशय. २ आसक्तिरहित. ३ संपूर्ण. ४ एकसारखा. ५ फार पूर्वीची.